Pune Police

प्रेसनोट

दि.१८/१०/२०१७

## एटीएम कार्डसचा डेटा स्कीमरच्या सहाय्याने चोरी करून बँक खात्यातून रक्कम काढणारी आंतरराज्यीय टोळी सायबर क्राईल सेल, पुणे यांच्याकडून जेरबंद

पुणे शहरामध्ये गेले ३ महिन्यांपासून बनावट एटीएम कार्डचा वापर करून अज्ञाताकडून नागरीकांच्या बँक खात्यातून परस्पर रक्कमा काढल्या जात असल्याबाबतच्या तक्रारी सायबर काईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर येथे वारंवार प्राप्त होत होत्या. तक्रारदाराचे मुळ एटीएम कार्ड स्वत:जवळ असताना कोणीतरी बनावट एटीएम कार्डस तयार करून दिल्ली, मुंबई, गुजरात, दमण, कलकत्ता इ. ठिकाणाहून तक्रारदारांच्या बँक खात्यातील रकमा परस्पर काढून घेत होते. त्यासंबंधाने **कोरेगाव पोलीस ठाणे गु.नों.क्र. १७२/२०१७ क. ४१९, ४२०, ४७७, ३४ भारतीय दंड विधान सह क. ४३अ, ६६, ६६क, ६६ड माहिती तंत्रज्ञान कायदा** नोंद आहे, त्याचा तपास पोलीस निरीक्षक मनिषा झेंडे व पोलीस पथक करत आहे.

तक्रारदारांच्या बँक स्टेटमेंट विश्लेषणामध्ये असे आढळून आले की, तक्रारदारांची फसवणूक होण्यापुर्वी त्यांनी त्यांच्याकडील एटीएम कार्डसचा वापर पुणे शहरातील कोरेगाव पार्क, मगरपटटा, आप्पा बळवंत चौक या भागातील येस बँक, आयसीआयसीआय बँकेच्या एटीएम सेंटर्समध्ये केला होता. नमूद एटीएम सेंटर्सची पाहणी केली असता तेथे संबंधीत बँकांकडून सुरक्षारक्षक नेमण्यात आले नसल्याचे आढळले. नमूद एटीएम सेंटरमधील सीसीटीव्ही फूटेजच्या आधारे विश्लेषण करण्यात आले व सापळा रचून आरोपी क्र. १ **करण मेहर सोनार वय ३८ वर्षे रा.ठि. मिरारोड, ठाणे** यास कोरेगाव पार्क परिसरामध्ये शिताफीने ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यामध्ये एटीएम मशीनला लावण्यात येणारे **स्कीमर-त्यामध्ये मॅग्नेटीक कार्ड रिडर, एटीएम मशिनचे पार्टस व त्यावर मोबाईल सर्किटचा वापर करून बनविण्यात आलेले २ पीनहोल स्पाय कॅमेरे, टीपी लिंक कंपनीचा सिमकार्डची सोय असलेला राऊटर व २ मोबाईल स्क्रीन्स, पोर्टेबल चार्जर, स्कीमर मशिनला चिटकविण्यासाठी डबलगम असलेला टेप बंडल्स, ४ कटर्स, विविध प्रकारचे चार्जर्स, २४ बनावट एटीएम कार्डस, रोख रक्कम** मिळून आली आहे.

झालेल्या तपासामध्ये आरोपीनी एनसीआर या कंपनीच्या एटीएम मशिनच्या कार्ड स्वाईप स्लॉट सारखकाच त्याचेवर फिट होणारा बनावट स्लॉट वापरुन एटीएम कार्डचा डेटा चोरी करणारा **इलेक्ट्रॉनिक स्कीमर** बनविला असल्याचे व त्यांचा अत्याधुनिक पद्धतीने वापर करून इंटरनेटच्या माध्यमातून नागरीकांच्या एटीएम कार्डची माहिती चोरी करून ती ऑनलाईन पद्धतीने मिळविण्यात येत होती. सदरची गुन्हे कार्यप्रणाली प्रथमत:च आढळून आलेली आहे.

एनसीआर या कंपनीच्या एटीएम मशीनचा कार्ड रिडर सारखाच पार्ट ऑनलाईन मागवून त्यामध्ये सिस्टीम बसवून स्कीमर बनविण्यात आला आहे. पीन क्रमांकाची चोरी करण्यासाठी मोबाईल सर्किटसचा वापर करण्यात आला आहे, एटीएम पीन चोरी करणारा स्पाय कॅमेरा बनविण्यात आला आहे व त्याची राऊटरच्या सहाय्याने इंटरनेटवरून तक्रारदारांच्या एटीएम कार्डसचा डेटा चोरी केला आहे, चोरीच्या डेटाचा वापर करून बनावट एटीएम कार्डस तयार करण्यात आले व त्यादवारे दिल्ली, मुंबई, दमण, कलकत्ता येथे एटीएम सेंटरमध्ये वापर करून रकमा काढण्यात येत होत्या.

आरोपीं क्र. १ करण सोनार याचे सोबत **आरोपी क्र. २ अर्ल ॲन्ड्यु अर्नेस्ट लॉरेन्स वय ३७ वर्षे रा. बि- १०२, अलङ्क नंदा सेक्टर नं. २, वसंतनगरी,वसई (ईस्ट)ठाणे.** हे दोघे इतर दोन साथिदारांचे मदतीने पुण्यामध्ये विविध भागातील एटीएम सेंटर्सची पाहणी करत व सिक्युरिटी गार्ड नसल्याचा फायदा घेवून एटीएम मशिनला स्कीमरची जोडणी करत होते. पुणे शहरात कोरेगाव पार्क, रेल्वे

स्टेशन, मगरपट्टा, आप्पा बळवंत चौक, बुधवार पेठ येथील विविध बँकांच्या **एटीएम सेंटर**मध्ये आरोपींनी गेल्या ३ महिन्यांमध्ये वारंवार स्कीमर बसवून नागरीकांच्या एटीएम कार्ड डेटा चोरी केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

आत्तापर्यंत आरोपींनी पुणे शहरातून एकूण ११ एटीएम सेंटर्सवरील अंदाजे **१३४ च्यावर एटीएम कार्ड**चा डेटा चोरी केला असून बनावट एटीएम कार्डसच्या सहाय्याने अंदाजे **६० लाख रूपये** रक्कम फसवणूक करून काढली आहे.

आरोपी क्र १ व २ यांना सदरचे स्कीमर बनविण्यास व त्याचा वापर करण्यास **आरोपी क्र. ३. BOBY UGOCHUKWE** रा. **फ्लॅट नं. ४०४, ब्लॉक नं.ई, सेक्टर नं. १५ गौरव मैथन अपार्टमेंट मिरा रोड ठाणे. या नायजेरीयन** नागरीक/आरोपीने मदत केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपींकडे तपास चालू असून त्यांनी मुंबई व मुंबई परिसरात राहणारे अन्य पाहिजेत ४ आरोपी -सईद सय्यद, यासीर सय्यद, रोहित नायर, सज्जाद यांच्या मदतीने दिल्ली, कलकत्ता, मुंबई, गुजरात राज्यातील व दमण या केंद्रशासीत प्रदेशातील गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

***नागरीकांनी एटीएम सेंटर्समध्ये एटीएम कार्डचा वापर करण्यापुर्वी कार्ड रिडरची पाहणी करावी तसेच पीन क्रमांक दाबताना एटीएम मशिनला अगर आजूबाजूस, छताला पीनहोल कॅमेरा नाही याबाबत खात्री करावी, संशयास्पद कॅमेरा व स्कीमर आढळल्यास बँकेस व सायबर क्राईम सेल यांना तात्काळ संपर्क करावा. एटीएम सेंटर येथे सिक्युरिटी गार्डस नसल्यास एटीएम सेंटरमध्ये असलेल्या तक्रारबुकमध्ये तक्रार नोंदवावी अगर बँकेस कळवावे. एटीएम कार्डचा इंटरनेट, हॉटेल्स, मॉल्स इ. ठिकाणी वापर करताना एटीएम पीन क्रमांक कोणासही न सांगता तो स्वतः दाबावा. एटीएम कार्ड क्रमांक / व्हॅलिडीटी / सीव्हीव्ही क्रमांक इ. गोपनिय माहिती फोनद्वारे कोणासही देवू नये असे आवाहन सायबर क्राईम सेल यांच्याकडून करण्यात येत आहे.***

सदरची कामगिरी आर्थिक व सायबर, गुन्हे शाखेचे श्री.सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयुक्त, श्री. मिलींद पाटील सहाय्यक पोलीस आयुक्त, श्रीमती राधिका फडके वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी श्रीमती मनिषा झेंडे पोलीस निरीक्षक, सचिन गवते सहाय्यक पोलीस निरीक्षक, विक्रम मिसाळ पोलीस उपनिरीक्षक, पो.कर्मचारी – दिपक भोसले, किरण अब्दागिरे, नवनाथ जाधव, अनुप पंडीत, आदेश चलवादी, शिरिष गावडे, सोमनाथ बोरडे, शितल वानखेडे यांनी केली आहे.

Shiremath

**(सुधीर हिरेमठ)**
**पोलीस उप-आयुक्त**
**आर्थिक व सायबर, गुन्हे**
**पुणे शहर**

प्रति,

संपादक
सर्व दैनिके/साप्ताहिके/मासिके

